# महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ

## (स्वायत्त)

शासकीय तंत्रनिकेतन इमारत, चौथा मजला, ४९, खेरवाडी, अलीयावर जंग मार्ग,
बांद्रा (पूर्व), मुंबई - ४०० ०५१.

फॅक्स ९१-०२२-२६४७३९८० दूरध्वनी क्र. - २६४७२१२२,२६४७१२५५,२६४७९२९६

Email : secretary@msbte.com Web : www.msbte.com


---

जा.क्र.मरातंशिमं/का - ५०/२००८-०९/५६४७ दिनांक– १९/०६/२००८

---

प्रति,
प्राचार्य,

Foundation,
Art Teacher Diploma and
Diploma in Art Education
चालविणाऱ्या सर्व संस्था (शासनमान्य)

**विषय : २००८-०९ या शैक्षणिक वर्षापासून MSBTE ने तयार केलेला अभ्यासक्रम राबविण्याबाबत**

संदर्भ : १) शा.नि., उ.व तं.शि.वि., क्र.एडीआर-१४०५/(२१२/०५)/भाग-२/तांशि-७, दि.३१/८/२००७
२) दि.०५/०५/२००८ रोजीच्या लोकसत्ता वर्तमानपत्रातील जाहिरात

या पत्राद्वारे आपणांस कळविण्यात येते की, संदर्भ क्र.१ वर नमूद केलेल्या शासन निर्णयानुसार सन २००८-२००९ पासून खालील अभ्यासक्रम महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळाने तयार केलेल्या नव्या अभ्यासक्रमानुसार राबवावयाचे आहेत. तसेच सदर अभ्यासक्रमांची परीक्षा या मंडळाकडून घेण्यात येणार आहे.

**१) फाऊंडेशन अभ्यासक्रम (Foundation Course)**
**२) आर्ट टिचर पदविका अभ्यासक्रम (Art Teacher Diploma)**
**३) पदविका आर्ट एज्युकेशन (Diploma in Art Education)**

तरी सदरची बाब आपण आपल्या संस्थेत या अभ्यासक्रमांना प्रवेश घेणाऱ्या / घेण्यास उत्सुक असणाऱ्या विद्यार्थ्यांच्या व पालकांच्या निदर्शनास आणावी. तसेच फाऊंडेशन कोर्स व प्रथम वर्ष आर्ट टिचर डिप्लोमा आणि डिप्लोमा इन आर्ट एज्युकेशनचे अभ्यासक्रम मंडळाच्या वेबसाईटवर उपलब्ध आहेत. त्यांच्या प्रिंट आऊट घेऊन वा त्याची प्रत मंडळाच्या विभागीय कार्यालयातून आणून विद्यार्थ्यांच्या निदर्शनासाठी ठळकपणे दिसेल अशा पध्दतीने नोटीस बोर्डवर लावावी.

सन २००८-२००९ चे उपरोक्त अभ्यासक्रमांचे शैक्षणिक वेळापत्रक महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळाच्या **www.msbte.com** या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. तसेच यापुढील सर्व सूचना, परिपत्रके मंडळाच्या सदर संकेतस्थळावर उपलब्ध असतील. तरी सर्व संस्थांनी वेळोवेळी संकेतस्थळावर संपर्क साधून त्यानुसारच कार्यवाही करावी.

त्याअनुषंगाने शैक्षणिक वर्ष २००८-२००९ मधील प्रवेश प्रक्रिया पूर्ण करुन दि.०१ जुलै २००८ पासून शैक्षणिक वर्ग सुरु करावयाचे आहेत.

सचिव,
म.रा.तंत्र शिक्षण मंडळ,
मुंबई-५१

प्रत : मा.संचालक, म.रा.तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई यांना माहितीकरीता सविनय सादर

प्रत : मा.संचालक, कला संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई-१ यांना माहितीकरीता सविनय सादर

प्रत माहिती व पुढील कार्यवाहीकरीता रवाना :

१) उपसचिव, निकाल विभाग, म.रा. तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई
२) उपसचिव, म.रा. तंत्र शिक्षण मंडळ, विभागीय कार्यालय पुणें / औरंगाबाद / नागपूर आणि मुंबई उपविभाग यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी.
३) Web Portal Incharge, म.रा. तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई